# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 12 June 2024
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – १२ जून २०२४ सायंकाळी ६.१०

****

- १८व्या लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनाचं येत्या २४ जूनपासून आयोजन.
- आंध्रप्रदेश तसंच ओडिशात पंतप्रधानांच्या उपस्थितीत नव्या राज्यसरकारांचा शपथविधी.
- पक्षविरोधी कारवाया प्रकरणी प्रदेश काँग्रेसच्या दोन पदाधिकाऱ्यांसह तिघे निलंबित.

आणि

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारत आणि अमेरिका सामना.

****

१८व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन येत्या २४ जूनपासून सुरु होणार आहे. या अधिवेशनात नवनिर्वाचित खासदारांना सदस्यत्वाची शपथ, लोकसभा अध्यक्षांची निवड तसंच राष्ट्रपतींचं अभिभाषण होणार असल्याचं, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं. हे अधिवेशन तीन जुलै पर्यंत चालेल. राज्यसभेचं अधिवेशन देखील २७ जून ते तीन जुलै पर्यंत होणार आहे.

दरम्यान, राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाची अधिसूचना राज्यपाल रमेश बैस यांनी आज जारी केली. त्यानुसार विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाचं अधिवेशन येत्या २७ जून रोजी सुरु होणार आहे.

****

आंध्रप्रदेश आणि ओडिशात नव्या राज्य सरकारांचा शपथविधी सोहळा आज पार पडला. या दोन्ही शपथविधी सोहळ्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय मंत्री आणि भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते.

तेलगूदेशम पक्षाचे अध्यक्ष चंद्राबाबू नायडू यांनी आज आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. विजयवाडा इथं झालेल्या या कार्यक्रमात राज्यपाल एस अब्दुल नझीर यांनी नायडूंसह, नारा लोकेश, पवन कल्याण आणि इतर २२ मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.

ओडिशात भुवनेश्वर इथं झालेल्या शपथग्रहण सोहळ्यात भाजपनेते मोहन चरण मांझी यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली, राज्यपाल रघुवर दास यांनी कनकवर्धनसिंह देव आणि प्रभाती परिदा या दोन उपमुख्यमंत्र्यांसह इतर मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.

****

केंद्र सरकारने राजकीय विरोधकांना संपवण्यात आनंद मिळवण्यापेक्षा आपल्या जबाबदाऱ्या पार पाडाव्यात, असा सल्ला माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिला आहे. आज मुंबईत मातोश्री या आपल्या निवासस्थानी ते पत्रकार परिषदेत बोलत होते. या वेळी मुंबई पदवीधर मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार विधीज्ञ अनिल परब ह्यांच्या 'संकल्प पत्रा'चं प्रकाशन ठाकरे यांच्याहस्ते करण्यात आलं.

दरम्यान, नाशिक शिक्षक मतदार संघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार संदीप गुळवे हे महाविकास आघाडीचे उमेदवार असतील असं आज जाहीर करण्यात आलं.

या मतदार संघातून डॉ. राजेंद्र विखे, काँग्रेसच्या वतीने अर्ज दाखल करणारे दिलीप पाटील आणि भाजप इच्छुक धनराज विसपुते यांच्यासह १५ उमेदवारांनी माघार घेतली आहे. त्यामुळे आता ॲड. संदीप गुळवे, शिवसेनेचे किशोर दराडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे महेंद्र भावसार आणि अपक्ष उमेदवार विवेक कोल्हे अशी लढत रंगण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे कोकण पदवीधर मतदारसंघातून शिवसेनेचे संजय मोरे यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला, त्यामुळे या मतदार संघातून महायुतीचे उमेदवार निरंजन डावखरे यांचा निवडून येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

****

लोकसभा निवडणुकीत पक्षविरोधी कारवाया केल्यामुळे सचिव प्रशांत गावंडे, सरचिटणीस सत्संग नारायणराव मुंडे, तसंच माजी आमदार नारायणराव श्रीमंतराव मुंडे यांना काँग्रेस पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आलं आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांच्या निर्देशाने ही कारवाई करण्यात आल्याचं, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष नाना गावंडे यांनी सांगितलं.

****

आगामी विधानसभा निवडणुकांसाठी आपण राज्यव्यापी दौरे करणार असल्याचं राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सांगितलं आहे. आज मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. लोकसभा निवडणुकीतील उणीव भरून काढून आम्ही विधानसभा निवडणुकींना सामोरं जाऊ. असं तटकरे यांनी सांगितलं.
दरम्यान, महायुतीत कोणतेच वाद नाहीत असं सांगत विधानसभा निवडणुकीत कोणतेही समज - गैरसमज होणार नाही याची काळजी घेतली जाईल असं, राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी सांगितलं आहे, ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते.

****

जर्मनीतील बाडेन-वुटेनबर्ग या राज्यासोबत उद्योग क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ पुरवण्याकरता झालेला करार हा मनुष्यबळ विकास क्षेत्रातील मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे. या करारासंदर्भात एक बैठक जर्मनीत स्टुटगार्ड इथं पार पडली, या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभाग नोंदवला, त्यावेळी ते बोलत होते. मानव संसाधन विकासातील आंतरराष्ट्रीय सहकार्याचे फायदे जगाला दाखवणारा हा करार, इतर देशांसाठी पथदर्शी ठरेल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

****

राज्यात पणन महासंघासह इतर संस्थांनी आवश्यकतेनुसार आणि प्राप्त उद्दिष्टानुसार आपल्या वाट्याच्या खतसाठ्याची संपूर्ण उचल करावी. तसंच त्यानंतरही आवश्यकता असल्यास कृषी विभागानं पणन महासंघास अतिरिक्त कोटा मंजूर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. पवार यांनी त्यांच्या मंत्रालयीन दालनात पणन महासंघाच्या विविध मागण्यांसंदर्भात बैठक घेतली, त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीला कृषीमंत्री धनंजय मुंडे, पणन महासंघाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे, यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते.

****

दरम्यान, शेतकऱ्याला केंद्रबिंदू मानून शेतकऱ्यांसाठी पणन विषयक सुविधा निर्माण कराव्यात, अशा सूचना पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी दिल्या आहेत. राज्य कृषी उत्पादन मंडळाच्या १५२ व्या संचालक मंडळाची सभा पणन मंत्री अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात पार पडली. यावेळी ते बोलत होते. यावेळी मंडळामार्फत छत्रपती संभाजीनगर, सिल्लोड तसंच श्रीरामपूरसह राज्यात उभारण्यात येणाऱ्या नियोजित प्रकल्पांचं सादरीकरण करण्यात आलं. सिल्लोड तालुक्यात उत्पादित होणाऱ्या मिरचीचं उत्पादन आणि गुणवत्ता विचारात घेऊन तिथं मिरचीसाठी सुविधा केंद्र निर्माण करावं, आदी सूचनाही मंत्री सत्तार त्यांनी यावेळी दिली.

****

राष्ट्रीय परीक्षा परिषदेने वैद्यकीय प्रवेश पात्रता परीक्षा-नीट संदर्भात एक प्रश्नावली जारी केली आहे. नीट परीक्षेच्या निकालानंतर उपस्थित केल्या जात असलेल्या विविध आक्षेपांसंदर्भात या प्रश्नावलीत काही बाबी स्पष्ट करण्यात आल्या असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

टी - ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा सामना अमेरिकेसोबत होणार आहे. न्यूयॉर्क इथं होणारा हा सामना भारतीय वेळेनुसार रात्री आठ वाजता सुरु होईल. गुणतालिकेत अ गटात भारत पहिल्या तर अमेरिका दुसऱ्या स्थानावर आहे.

****

हिंगोली जिल्ह्यात एका शेतकऱ्याचा अंगावर वीज कोसळून मृत्यू झाला. कळमनुरी तालुक्यात आखाडा बाळापूर नजीक पिंपरी इथं ही घटना घडली. सदर शेतकरी चारा घेऊन जात असताना वीज पडून त्यांचा मृत्यू झाल्याचं आमच्या वार्ताहरांनी कळवलं आहे.

दरम्यान, जिल्ह्यात कालपासून संततधार पाऊस सुरु असुन सिरसम, बासंबा, हिंगोली आणि माळहिवरा या चार मंडळात अतिवृष्टी झाली आहे.

****

बुलडाणा जिल्ह्यात एका बालिकेचा वादळी वाऱ्यात झोका उडाल्यानं मृत्यू झाला. चिखली तालुक्यात देऊळगाव घुबे इथं ही घटना घडली. झाडाला बांधलेला झोका

वाऱ्यामुळे हवेत उंच उडून जमिनीवर आपटल्यानं सहा वर्षीय बालिकेचा जागीच मृत्यू झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात शेतकऱ्यांनी पुरेसा पाऊस झाल्याची खात्री करून खरिपाच्या पेरण्यांना सुरुवात करावी असं आवाहन जिल्हा कृषी अधिकाऱ्यांनी केलं आहे, उमरगा तालुक्यातील काही गावात पेरण्या सुरू झाल्या असून यंदा मृगाचा पाऊस वेळेवर झाला असल्यामुळे उडीद, मूग यासारख्या नगदी पिकांनाही भरपूर वाव असल्याचे त्यांनी सांगितलं. जिल्ह्यात चालू वर्षी आतापर्यंत १२४ मिलिमीटर पाऊस झाला आहे.

****

लातूर जिल्ह्यात सर्वत्र चांगला पाऊस झाला असून आता खरीप पेरणीला सुरूवात झाली आहे. त्यामुळे बोगस बियाणे, खतांची विक्री होवू नये, यासाठी कृषि विभागाने सतर्क राहून काम करावं, अशा सूचना लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या आहेत. त्या आज जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठकीत बोलत होत्या. चांगल्या दर्जाची बियाणे आणि खते उपलब्ध होण्यासाठी कृषि विभागाने आवश्यक कार्यवाही करावी, बोगस बियाणांवर कारवाईसाठी भरारी पथके स्थापन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

****

प्रशासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट कामकाज करुन शासनाची प्रतिमा जनमानसात उंचवावी, असे आवाहन छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केलं आहे. आज जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व विभागांचे अधिकारी तसंच सर्व श्रेणीतील कर्मचारी यांचं प्रशिक्षण पार पडलं. यावेळी ‘प्रशासकीय कामकाज व संवाद कौशल्य’, या विषयावर जिल्हाधिकारी दिलीप स्वामी बोलत होते.

****

ठाणे इथं आज एका डंपरने मोटारसायकलीला दिलेल्या धडकेत ठाणे गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलिस हवालदार सुनिल रावते आणि त्यांच्यासोबत दुचाकीवर असलेल्या एका महिलेचा मृत्यू झाला. आज सकाळी साडे अकरा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. अपघातानंतर डंपर चालक पसार झाला असून त्याचा शोध घेण्यात येत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.